आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

२५व्या शांघाय सहकार्य संस्थेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी चीनमध्ये दाखल

मराठवाड्यातल्या मराठा समाजातल्या उर्वरित नागरिकांना लगेच कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मनोज जरांगे पाटील यांचा आग्रह

रशिया - युक्रेन संघर्षावर युरोपीय देशांनी सुचवलेल्या तहातल्या कलमांवर युक्रेनचा आक्षेप

आणि

२५ व्या राष्ट्रकुल वरिष्ठ वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारत पदकतालिकेत अव्वल स्थानी

**<><><><>**

२५व्या शांघाय सहकार्य संस्थेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज चीनच्या तियानजिन इथं पोहोचले. ही शिखर परिषद उद्या सुरू होईल. या परिषदेत प्रधानमंत्री जागतिक नेत्यांशी  स्थानिक सुरक्षा, कनेक्टिव्हिटी, शाश्वत विकास, जागतिक सहकार्य यासह विविध विषयांवर चर्चा करणार आहेत. शांघाय सहकार्य संस्थेच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा, तसंच १० वर्षांच्या विकास धोरणावरही या परिषदेत चर्चा होईल. २० देशांचे प्रमुख आणि १० आंतरराष्ट्रीय संघटनांचे नेते या परिषदेसाठी चीनला आले आहेत.

**<><><><>**

चीनला जाण्यापूर्वी प्रधानमंत्र्यांनी जपानमध्ये विविध कार्यक्रमात भाग घेतला. १५ व्या भारत - जपान वार्षिक शिखर परिषदेदरम्यान सुरू केलेल्या भागीदारी उपक्रमामुळे दोन्ही देशातल्या  व्यापार, तंत्रज्ञान, पर्यटन, कौशल्य, सुरक्षा आणि सांस्कृतिक भागीदारीला चालना मिळेल, असं ते म्हणाले. मोदी यांनी जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासह आज बुलेट ट्रेननं प्रवास केला. सेंदई इथल्या इलेक्ट्रॉन कारखान्याला त्यांनी भेट दिली.

**<><><><>**

संयुक्त अरब अमिरातीसोबत, खाद्य सुरक्षा, नवोन्मेश, शाश्वतता आणि पुरवठा साखळी यासारख्या क्षेत्रात नव्या संधींविषयी चर्चा केल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र व्यापार मंत्री थानी अल झेयोदी यांच्यासोबत मुंबईत ही चर्चा झाली. हरित ऊर्जा, खाद्य सुरक्षा, आरोग्य आणि आर्टिफिशियल इंटिलिजन्स यासारख्या क्षेत्रात द्विपक्षीय व्यापारासाठी अनेक संधी उपलब्ध असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

<><><><>

मोबाईलसाठी उपयुक्त असलेल्या भारतातल्या पहिल्या टेम्पर्ड ग्लास उत्पादन सुविधेचं उद्घाटन आज उत्तर प्रदेशात नोएडा इथे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते झालं. आता यापुढे भारत टप्प्याटप्प्याने मोबाईल फोनशी संबंधित प्रत्येक घटकाचं उत्पादन करेल. असं वैष्णव यावेळी म्हणाले.

<><><><>

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता हा केवळ पर्याय नसून जीविताची हमी आणि प्रगतीसाठी महत्वपूर्ण असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत संरक्षण परिषदेत बोलत होते.

<><><><>

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी सार्वजनिक जागांची जलदगतीने स्वछता करण्यावर लक्ष केंद्रित करायला हवं, असा सल्ला गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल यांनी आज दिला. स्वच्छ भारत मिशनच्या दुसऱ्या टप्प्याच्या बैठकीत ते बोलत होते.

<><><><>

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या आर्थिक विकासदरात ७ पूर्णांक ८ टक्के वाढ झाल्याबद्दल तज्ञांनी समाधान व्यक्त केलं आहे. हा दर साडे सहा टक्के राहील असा अंदाज रिझर्व्ह बँकेनं पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत वर्तवला होता.

पहिल्या तिमाहीत दर्शवलेल्या मजबूत आणि स्थिर वाढीला प्रभावी धोरण आणि देशांतर्गत बाजारपेठेतील वाढती मागणी कारणीभूत ठरत असल्याचं असोचेमचे अध्यक्ष संजय नायर यांनी म्हटलं आहे.

देश जागतिक स्तरावर अनेक अडचणींचा सामना करत असताना अर्थव्यवस्थेचा विकास होत असल्याचं फिक्कीच्या महासंचालक ज्योती विज यांनी म्हटलं आहे.

याविषयी ब्रह्मा रिसर्च फाऊंडेशनचे संस्थापक विजय पागे म्हणाले.

**- - -होल्ड - बाईट - -**

**- <><><><>**

मराठवाड्यातला मराठा हा कुणबीच असून उद्यापासून मराठा समाजातल्या उर्वरीत नागरिकांना कुणबी प्रमाणपत्राचं वाटप करावं अशी भूमिका, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज मांड़ली. मराठा आरक्षण विषयक समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी आज मुंबईच्या आझाद मैदानात उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली, त्यावेळी जरांगे बोलत होते. या आंदोलनाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले. शिंदे समितीनं आज यासंदर्भात जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. यावेळी मराठा समाजातल्या उर्वरित नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र द्यायला सहा महिन्यांची मुदत हवी असं न्यायमूर्ती शिंदे यांनी जरांगे यांना सांगितलं. मात्र शिंदे समितीने तेरा महिने यावर अभ्यास केला आहे, त्यामुळे कुणबी प्रमाणपत्रांचा निर्णय तातडीनं लागू करावा, सातारा आणि हैदराबाद गॅझेटियरमधल्या नोंदी तातडीने स्वीकाराव्यात, असा आग्रह जरांगे यांनी धरला. तसंच औंध आणि बॉम्बे गॅझेटियर दोन महिन्यात लागू करावा अशी मागणी त्यांनी केली. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसांना तातडीनं १० लाख रुपये आणि नोकरी द्यायची मागणीही जरांगे यांनी लावून धरली आणि उपोषण मागे घ्यायला नकार दिला.*

*मंत्रिमंडळानं हैदराबाद गॅझेटसह काही गोष्टींना तत्त्वतः मान्यता दिल्याची माहिती न्यायमूर्ती शिंदे यांनी दिली. राज्यभरातून कुणबी प्रमाणपत्रासाठी ५८ लाख अर्ज प्राप्त झाले असून यापैकी दहा लाख जणांना कुणबी प्रमाणपत्र दिलं आहे. जातीचं प्रमाणपत्र व्यक्तिला दिलं जातं समुहाला नाही, असं शिंदे यांनी जरांगे यांना कळवलं. या चर्चेदरम्यान जरांगे यांचं*

*काही प्रमाणात समाधान झालं असून इतर मुद्द्यांवर त्यांचं म्हणणं मंत्रिमंडळासमोर मांडू, अंतिम निर्णय तिथं घेतला जाईल, असंही न्यायमूर्ती शिंदे यांनी स्पष्ट केलं.*

*दरम्यान, निर्णय घेण्याचा अधिकार न्यायमूर्ती शिंदे यांना नाही, तरी सरकारने त्यांना चर्चा करण्यासाठी पाठवल्याबद्दल जरांगे यांनी नाराजी व्यक्त केली.)*

**<><><>**

दरम्यान, मुंबई पोलिसांनी या आंदोलनाला आणखी एक दिवसाची परवानगी दिली आहे.

मराठा आरक्षण प्रश्नावर संवैधानिक चौकटीत राहून तोडगा काढू,  असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीला शासनानं ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

आऱक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेऊन त्यासाठी संविधानात सुधारणा करायला हवी,  या मागणीचा पुनरुच्चार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. तामिळनाडूमधे आरक्षणाची मर्यादा ७२ टक्के असण्याकडे लक्ष वेधत पवार यांनी,  आऱक्षणाची मर्यादा वाढवणं गरजेचं असल्याचं म्हटलं.

दरम्यान, या आंदोलनासाठी लातूरमधल्या अहमदपूर तालुक्यातल्या टाकळगावातून आलेले विजय घोगरे यांचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं.

**<><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मुंबईत लालबागच्या राजासह विविध ठिकाणी गणपतीचं दर्शन घेतलं. केंद्रीय आरोग्य मंत्री आणि भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज पुण्याचं ग्रामदैवत कसबा गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतींचं दर्शन घेतलं आणि पूजा केली.

**<><><>**

रशिया - युक्रेन संघर्षावर युरोपीय देशांनी सुचवलेल्या तहातलं कलम युक्रेनने फेटाळलं आहे. रशिया आणि युक्रेनियन सैन्यादरम्यान ४० किलोमीटर लांबीचा जमिनीचा पट्टा बफर झोन म्हणून ठेवण्याचा प्रस्ताव अवास्तव असून त्यात  युक्रेन कडून  भूभाग

हिरावून घेतला जाईल असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांचं म्हणणं आहे. रशियाने या प्रस्तावाला सशर्त सहमती दर्शवली असली तरी कोणत्याही समझोत्यापूर्वी रशियन सैन्याची युक्रेनच्या भूमीवरुन पूर्णपणे पीछेहाट अपरिहार्य राहील असं युक्रेनने सांगितलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. यावेळी रशिया युक्रेन संघर्ष तसंच द्विपक्षीय संबंधांवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

**<><><><>**

अहमदाबाद इथं झालेल्या २५व्या राष्ट्रकुल वरिष्ठ वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावलं. ४ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्य अशी एकंदर १३ पदकं भारतीय वेटलिफ्टर्सनी मिळवली. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी मेहेक शर्मा हिनं २५३ किलो वजन उचलून सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी करत रौप्यपदकावर नाव कोरलं, तर लव्हप्रीत सिंह यानं एकंदर ३८० किलो वजन उचलून कांस्यपदक मिळवलं.

**<><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेली विविध प्रकारची आयात शुल्कं बेकायदेशीर असल्याचं सांगत, फेडरल न्यायालयाने रद्दबातल ठरवली आहेत. आंतरराष्ट्रीय आपत्कालीन अधिकार कायदा या करांना मान्यता देत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

**//<><><><>//**